
# गोंधळी समाजातील स्त्रीयांच्या वास्तव संघर्षाचा गाथा : तीन दगडाची चूल

**प्रा. अभिमन्यू गेना ओहळ**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,**
**छ. शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.**




**प्रास्ताविकः**

मराठी साहित्यामध्ये आत्मकथन हा एक महत्वाचा साहित्यप्रकार आहो. आपले जीवनातील चढउतार, चांगले वाईट प्रसंग साहित्यातून मांडण्यासाठी बऱ्याच लेखकांनी हा साहित्यप्रकार निवडला आहे. मराठी साहित्य क्षेत्रात दया पवार यांचं 'बलुतं' हे आत्मकथन आलं आणि त्यानंतर उपरा, उचल्या, अक्करमाशी, गबाळ, कोल्हाटयाचं पोरं, माज्या जल्माची चित्तरकथा, तराळ-अंतराळ, आठवणींचे पक्षी अशी अनेक आत्मकथने आली आणि साहित्यरसिकांनी, वाचकांनी, समीक्षकांनी त्याला अमाप लोकप्रियता मिळवून दिली. एकूणच हा साहित्यप्रकार मराठीसह अनेक भाषांमध्ये रूजला आणि रुढ झाला. यामध्ये दलित आत्मकथनकारांची संख्या विपूल प्रमाणात आहे. यात 'माज्या जल्माची चित्तरकथ'ा, 'तीन दगडांची चूल', 'मरणकळा' अशा स्त्री लेखिकांनी लिहिलेल्या आत्मकथनांचाही प्रामुख्याने समावेश होतो. विमल मोरे लिखित तीन दगडांची चूल हे आत्मथन यामध्ये विशेष महत्वाचे आहे. कारण स्त्रीयांनी लिहिले आहे. त्यामुळे भटक्या विमुक्त जमातीतील स्त्रीयांनी लिहिले आहे. त्यामुळे या आत्मकथनांचे स्वरूप हे दुधारी आहे. ही भटक्या विमुक्त समाजातील स्त्रीयांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांची, संघर्षाची गाथाच आहे. गोंधळी समाजाचे आणि त्या समाजातील स्त्रीयांचे प्रश्न या आत्मथनातून प्रत्ययास येतात.

**गोंधळी समाजः**

आपल्या उपजिविकेसाठी सतत या गावाहून दुसऱ्या गावी भटकंती करत फिरणाऱ्या भटक्या जाती जमातींपैकी गोंधळी ही एक जमात देवाच्या दारोदार भिक्षा मागून उपजिविका करणारी जमात होय. ही जमात महाराष्ट्रीयन आहे आणि त्यांची भाषा ही मराठी आहे. भिक्षा मागताना ते आपल्या 'पारुषी' या सांकेतिक भाषेचा वापर करतात. गोंधळी या जमातीच्या 'गावगोंधळी' व 'भराडी गोंधाळी' अशा दोन उपजाती आहेत. गाव गोंधळी हे गावात वास्तव्य करून राहतात तर भराडी गोंधळी हे देवीच्या नावाने गावोगाव भटकत भीक्षा मागून जगतात. याशिवाय रेणूराई व कदमराई या गोंधळी समाजाच्या उपजाती महाराष्ट्रात आढळतात. भराडी गोंधळयांना 'आईचे गोंधळी' म्हणूनही ओळखले जाते. लग्नानंतर घरात संपन्नता यावी, समृध्दी नांदावी, नवीन जोडप्याला सुखसमाधान लाभावे म्हणून भराडी गोंधळयाला बोलावून, रात्रभर देवीची आराधना करून देवीचा गोंधळ घतला जातो. या गोंधळावरूनच यांना गोंधळी हे नाव रूढ झाले आहे. पूर्वा या जमाती हेरगिरीसाठी प्रसिध्द असल्याने त्यांना राजाश्रय होता. आपल्या या कलेचा उपयोग गोंधळी समाजाने पोट भरण्यासाठी केलेला आढळतो. या जमातीमध्ये जातपंचायतीचे प्रस्त आहे. मुलीच्या बापाला हुंडा देण्याची म्हणजेच 'देज' देण्याची प्रथा या समाजात आढळते. हक्काचे गाव, हक्काची जमीन व घर नसल्याने या जमातींच्या नशिबी सतत भटकंतीच आलेली आहे. काळूबाई व भवानी (अंबाबाई) या दोन्ही या जमातींच्या कुलदैवता आहेत.

**तीन दगडाची चूलः**

'तीन दगडाची चूल' हे विमल मोरे यांचं आत्मकथन आहे. अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, जातपंचायत या सर्व जुनाट रुढींच्या गर्तेत अडकलेल्या समाजाची, समाजातील स्त्रीयांची कहाणी आहे. विमल मोरे यांचा मोठा भाऊ हा पोलिस असतो. त्याने शिक्षणाचे महत्व ओळखले होते. म्हणून तो छोटया विमलला शाळेत घालायचे ठरवले. परंतु मुलींसाठी शिक्षण हे नाहीच या गैरसमजामुळ` विमलचे वडील विमलला शाळेत घालण्यास विरोध करतात. परंतु भावाजवळ राहून विमल शाळेत जाऊ लागते. परंतु आई आपले पोट भटकंतीवर भरत असताना ती परत विमलला पालावर घेऊन जाते, प्रसंगी शाळा बुडाल्यामुळे विमलला बाईचा मार खावा लागतो. गोंधळी समाजाच्या मागण्याच्या पध्दती विषयी विमल मोरे सांगतात की गोंधळी दैवाच्या गोंधळाची पुजा मांडतो. जरीचा फेटा, कोट, गळयात कवडयांची माळ घालून हातात संबळ, दुसऱ्याच्या हातात तुणतुणं तर तिसऱ्याच्या हातात झांज घेऊन गोंधळी गोंधळ घालतात. लग्न सराईत ही जमात गोंधळ घालुन तर इतर वेळी देवीच्या नावाने भीक्षा मागून खातात. परंतु आता पहिल्यासारखी माणसं देवाच्या नावाने भीक देत नाहीत. ती

शहाणी झाली आहेत. देव मानत नाहीत. म्हणून या जमातीतील लोक भांडी विकून आपली गुजरान करीत आहेत. ही जमात अंधश्रध्देच्या गर्तेत असल्याचे विमल मोरे सांगतात. आजारी पडले की भूतबाधा झाली, देवीचा कोप झाला अशी त्यांची समजूत असते.

या जमातीतील स्त्रीयांचे जीवन अतिशय भयानक आणि संघर्षाचे भरले असल्याचे विमल मोरे सांगतात, नवऱ्याचा मार तो नवरा आहे म्हणून सहन करणे ही या जमातीतील स्त्रीयांची ठाम समजूत आहे. या जमातींमध्ये 'स्त्री' ला कवडीमोल किंमत आहे. शाळेत लेखिका गोंधळी जमातीची असल्याने इतर मुली तिला शिवून घेत नाहीत. त्यामुळे छोटया विमलला शालेय वयातच अस्पृश्यतेला सामोरे जावे लागले. दोन भाऊ कमावते असूनही लेखिकेच्या आईची भटकंती थांबत नाही, उपासमार थांबत नाही. घरात कमावते कमी आणि खाणारे जास्त अशी स्थिती असल्याने कायम उपासमारीची स्थिती राहत असे. लेखिका नववी नापास होते तेव्हा पुण्याला शिवणक्लास लावते म्हणून घेऊन गेलेली बहीण लेखिकेकडून घरातील सर्व कामे करून घेत असे. परंतु लेखिकेची वहिणी मात्र लेखिकेचा अभ्यास घेऊन लेखिकेच्या शिक्षणासाठी धडपड करताना दिसून येते. गबाळ या आत्मकथनाचे लेखक दादासाहेब मोरे कुडमुडे जोशी या जमातीतील भटक्या-विमुक्तांच्या न्याय-हक्कासाठी झटणारे एक सक्रिय कार्यकर्ते भटक्या-विमुक्तांच्या संघटना बांधून त्यांनी अनेक लढे लढले. वेगवेगळया सभा, परिषदा, कार्यर्त्यांचे मेळावे घेऊन प्रश्नांसाठी झगडणारे ते व्यक्तिमत्व होते. विमल मोरे यांचा विवाह दादासाहेब मोरे यांच्याशी झाला. लग्नाच्या पहिल्या रात्रीच त्यांना पाणी पिऊन उपाशीपोटी झोपावे लागले. नवरी असताना ही भांडी धुण्यापासूनची सर्व कामे करावी लागली. दादासाहेब मोरे यांच्या सोबत राहत असताना त्यांना कधी उपाशी तर कधी कोंडयाची भाकरी खाऊन जगावी लागले. हे आत्मकथन दोन भागात आहे. पहिल्या भागात गोंधळी जमातीत जन्मलेल्या विमलचे खडतर बालपण, शिक्षण घेताना आलेले अनुभव, आईवडिलांची भटकंती, भाऊ-भावजयींचे वागणे या सर्व गोष्टी आल्या आहेत. तर दुसऱ्या भागात विवाहानंतर नोकरी नसलेल्या कार्यकर्त्याची पत्नी म्हणून जगतासना आलेले अनुभव, संसाराची आढाताण, उपवास, संघर्षमय जीवन, मनपरिवर्तन, घरातील लोकांकडून झ ाालेला त्रास या साऱ्यांचे वर्णन आले आहे.

तीन दगडाची चूल ही गोपाळ, कुडमुडे जोशी याच नव्हे तर समग्र भटक्या विमुक्तांच्याच संघर्षाची कहाणी आहे. गोंधळी समाज हा पालावर राहतो. ज्यावेळी पालावरील मुली उघडयावर अंघोळ करीत त्यावेळी गावातील टारगट मुलं छेड काढत. राम तेरी गंगा मैली, पाडाला पिकलाय आंबा अशी गाणी पोरींकडे बघून म्हणत. गोंधळ घालून अथवा देवीच्या नावानं भिक्षा मागून या समाजाला सदैव उपासमारीला सामोरे जावे लागते. रोजच्या नित्याच्या गरजाही ते पूर्ण करू शकत नाही. रोज लागणऱ्या वस्तू ही त्यांच्याकडे नसतात. दारूचे व्यसन असल्यामूळे घरात कायमच रडारड, भांडणे यामुळे कायम हाल. दुसऱ्यांचा संसार सुखाचा व्हावा, सर्वांची कुटुंब आनंदाने जगावी म्हणून गोंधळ घालणाऱ्या गोंधळयांची कुटुंब मात्र कायम दुःखात आणि उपासमारीने त्रस्त कसा हा विरोधाभास आहे. गोजराकाकीचे अवेळी जन्मलेले मूल मरते. परंतु तीला रडायला वेळ नसतो, ना दुःख करायला. पोटाच्या आगीपूढे सुतक न पाळता त्यांना पोटासाठी घराबाहेर पडावे लागते. रानावनात राहणाऱ्या लोकांना प्रेत जाळण्यासाठी जळणे, गौऱ्या घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांना प्रेतं पुरावे ला ागते. लेखिकेला दुसऱ्याचे दळण करून, स्वयंपकाची कामे करून, मेसचे डबे पुरवून संसार करावा लागला.

गोंधळी जमातीच्या जीवनातील कारण अंधश्रध्दा हे ही आहे. जेव्हा लहाणपणी लेखिकेला उष्णतेमूळे गोवर येते. तेव्हा सर्वजण देवीवर उष्टे पाणी टाकल्याने असे झाल्याचे म्हणतात. देवाचा कोप होईल म्हणून लेखिकेला तीची आई दवाखान्यातही नेऊ देत नाही. उपास-तापास, घरगुती उपाय करून ती आजार वाढवते. घरातील सर्वांना आजार होऊ नये म्हणून लेखिकेची आई सौंदत्तीच्या यल्लम्माला, माणकेश्वराच्या सटवाईला तर कधी गोंधळेवाडीच्या मरगम्माला नवस करतात. कर्ज काढून नवस फेडतात. मरगम्माच्या यात्रेचे स्वरूप सांगताना लेखिका म्हणते की, देवीच्या यात्रेसाठी सर्व गोंधळी गोंधळेवाडीला जमतात. जमा केलेली पुंजी या यात्रेवर खर्च करतात, कर्ज काढून बकरे-कोंबडयांचे बळी देतात. गोंधळी समाजात मुलगी होणं म्हणजे उरावरचा दगड समजला जातो. लहान वयातच त्यांचे लग्न लावले जाते. सुखदेवच्या आठ-नऊ वर्षाच्या बायकांची संसार करताना. दमछाक होताना दिसते. मुलीचे वयस्कर पुरुषांबरोबर लग्न लावून दिले जाते अशा अनेक प्रकारच्या संघर्षाची तीन दगडाची चूल ही गाथा आहे.

**समारोपः**

उदरनिर्वाहासाठी, उपजिवीकेसाठी एका गावाहून दुसऱ्या गावी सतत भटकंती करणाऱ्या, दारोदार देवाच्या नावाने भिक्षा मागणाऱ्या, लग्नानंतर कुटुंब सुखी समाधानाने जगावे म्हणून गोंधळ घालणाऱ्या गोंधळी समाजातील विमल मोरे यांचे 'तीन दगडाची चूल' हे आत्मकथन आहे. या आत्मकथनात भटक्या जमातीतील स्त्रीयांचे अनेक प्रश्न अधोरेखित झालेले आहेत. मुलगी म्हणजे उरावरचा दगड हीच समजूत असल्याने तिला शिक्षणापासून वंचित ठेवून लहाणपणीच लग्न केले जाते. कमी वयाच्या मुलींची वयस्कर माणसांबरोबर लग्न लावली जातात. उपासमार ही या समाजाच्या पाचवीलाच पुजली आहे. पारंपारिक व्यवसायावर पोट भरत नसल्याने या समाजातील स्त्री-पुरूष भांडी विकून आपला उदरनिर्वाह करून जगत आहेत. अंधश्रध्दा हा या समाजाला लागलेला शाप आहे. कर्ज काढून हा समाज नवस फेडतो, बकरे-कोंबडे करतो, आजारी पडल्यानंतर दवाखान्यात न जाता अंगारा-धुपारा केला जातो. भूकेच्या संघर्षाभोवती हे आत्मकथन फिरत राहते. स्त्रीयांच्या अनेक प्रश्नांना या आत्मकथनाने वाचा फोडली आहे. वाङमयीन आणि सामाजिक मुल्याच्या बाबतीत हे आत्मकथन महत्वपूर्ण असे आहे.



प्रा. अभिमन्यू गेना ओहळ
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, छ. शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.